## आत्महत्याप्रकरणी 'त्या' आरोपींना अटकपूर्व जामीन

**यवतमाळ** : येथील लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक संतोष गोरे यांनी जाचाला कंटाळून आत्महत्या केली. या प्रकरणात गोरे यांनी लिहिलेल्या चिठ्ठीवरून बडनेरा रेल्वे पोलिसांनी ३४ जणांवर आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला. त्यानंतर अमरावती सत्र न्यायालयात आरोपींनी अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता.यावर मंगळवारी आदेश झाला. न्यायालयाने आरोपींना अटक पूर्व जामीन मंजूर केला असून, त्यांना दर रविवारी रेल्वे पोलिसांकडे हजेरी लावण्याची अट घातली आहे. आरोपींना न्यायालयाकडे जामीन अर्ज केल्यानंतर सत्र न्यायालयाने रेल्वे पोलिसांकडे से मागितला होता. न्यायालयाकडून अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर करण्यात आला. या निर्णयामुळे अणे महिला महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक, संस्थेचे संचालक या सर्वांना दिलासा मिळाला आहे.

# दिवाळखोर दाते महिला अर्बन बँकेतील अब्जो रुपयांच्या ठेवींचे काय ?

▪ एकटया अपंग व्यक्तीचे अडकले सव्वाकरोड ▪ पंतप्रधान मोदींना साकडे

**रघुवीरसिंह चौहान**

**यवतमाळ, दि.९**: अत्यंत कष्टातून ज्यांनी शिक्षण महर्षी ही पदवी सामान्यांच्या -हदयातून प्राप्त केली.त्या बाबाजी दातेंच्या नावाने,सर्वसामान्यांच्या आर्थिक उत्कर्षाच्या गोंडस नावाखाली, येथील माईंदे चौकात" बाबाजी दाते महिला अर्बन बँकेची निर्मिती केली. ज्यांच्या हाती या बँकेची धूरा होती.त्यांच्याच पुढाकाराने अवघ्या २५ - ३० वर्षात बँकेच्या हजारो ठेविदारांच्या अब्जावधी रुपयांची अक्षरश: वाट लावली,म्हणजेच बँक दिवाळखोरीत निघाली. त्यापैकीच एक ठेविदार जे पूर्णत:अपंग आहेत,त्यांच्यावर झालेल्या अन्यायातून न्याय मिळावा असे विनंतीवजा निवेदन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठविले आहे. या एकटया अपंग ठेविदाराचे सव्वाकरोड रुपये अधांतरी लटकले आहे. देशात सरकार भाजपचे,पंतप्रधान भाजपचे,महाराष्ट्रात सरकार




महिला अर्बन बँकेतील अनियमितता भाग- १

भाजपचे,मुख्यमंत्री भाजपचे, बँक सुध्दा भाजपचीच आणि बँकेची वाट लावणारे सुध्दा भाजपचेच,मग न्याय कोणाला मागणार ? भाजपवाल्यांनाच ना...! म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडेच न्याय मिळण्याची अपेक्षा आहे. म्हणूनच अपंग ठेविदाराने सव्वाकरोडच्या आपल्या ठेवी परत मिळवून देण्याची विनंती पंतप्रधानांकडे केली आहे. यवतमाळातच नव्हे तर अख्या विदर्भात, अत्यंत कष्टातून ज्यांनी आयुष्यभर निष्कलंक आणि कर्मठ व्यक्तित्व म्हणून नावलौकीक प्राप्त केला. त्या शिक्षण महर्षी बाबाजी दाते यांच्या नावाने येथे" बाबाजी दाते महिला अर्बन बँक" स्थापन करण्यात आली. दाते यांच्या नावाचे गुडविल असल्याच्या संधीचा फायदा घेऊन,संचालक मंडळातील अनेकांसह तत्कालीन मुख्यकार्यकारी अधिकारी तथा या बँकेचे सर्वेसर्वा कंचलवार यांनी अनेकांना गळ घालून, मोठमोठया रक्कमांच्या ठेवी बँकेत ठेवून घेतल्या. प्रारंभी बाबाजी दाते महिला अर्बन बँक चांगलीच नावारुपाला आली होती. दिवसेंदिवस या बँकेची विश्वसनीयता वाढत होती. त्यामुळेच कष्टक-यांपासून ते गर्भश्रीमंतांपर्यंतच्या सर्वच वर्गातील नागरिकांनी आपापल्या मिळकतीतून भविष्यासाठी गोळा केलेल्या कष्टाच्या रक्कमा,बँकेत विविध हेडखाली ठेवी ठेवल्या. कोणी सेविंग तर कोणी करंट खात्यात तर कोणी फिक्सडिपॉझिट ठेवले. त्याचे कारण एवढेच होते की,आपल्या रक्कमा या बँकेत सुरक्षित राहील. भविष्यात जेव्हा आवश्यकता वाटेल, तेव्हा आपल्या रक्कमा बँकेतून काढून आपल्या संसारोपयोगी लावता येईल.

अनेकांनी तर आपल्या सेवानिवृत्तीनंतर मिळालेल्या मोठमोठया रकमा थेट याच बँकेत फिक्स डिपॉझिट तर काहींनी वेगवेगळ्या हेडखाली ठेवी ठेवल्या. या बँकेत ठेवी ठेवणारांच्या रक्कमा दहा हजार,पन्नास हजार, लाख,दोन लाख,पाच लाख,दहा लाख,पंचेवीस लाख, पन्नास लाख,एक कोटी, दोन कोटी अशा लहान-मोठ्या रक्कमा बँकेत ठेवी ठेवण्यात आल्या आहेत. ठेविदारांत सर्वसामान्य नागरिक, वृद्ध पुरुष-महिला,कष्टकारी,कर्मचारी, अपंग,व्यापा-यांसह विविध वर्गातील नागरिकांचा समावेश आहे. अशापैकीच एक ठेविदार श्यामसुंदर भूत आहेत. विशेष म्हणजे ते पूर्णतः अपंग आहेत,चालने-फिरणे तर सोडाच त्यांना एका जागेवरुन पाच फूट अंतरावर जरी जायचे असेल तरी त्यांना दुस-याकडून उचलून ठेवावे लागते. अशा अवस्थेत असणा-या श्यामसुंदर भूत यांनी आपल्या भविष्यकाळाच्या सुविधेसाठी, आपल्या पारिवारिक सदस्यांच्या नावे बाबाजी दाते महिला अर्बन बँकेत एक करोड,२४ लाख रपये फिक्सडिपॉझिट ठेवले आहे.पुढे ही बँक पूर्णतः दिवाळखोरीत निघाली असून, ठेविदारांच्या समोर आपापल्या ठेविंचे भवितव्य काय ? असा यक्ष प्रश्न उभा ठाकला आहे.

म्हणूनच ठेविदार श्यामसुंदर भूत यांनी देशातील सर्वोच्च नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे न्याय मिळवून देण्याची विनंती केली आहे.

मो.नं.९४२३४३३२४४

# ब्रह्माकुमारी संस्थेच्या मुख्य प्रशासिका दादी रतनमोहिनी १०१ व्या वर्षी कालवश

▪ आध्यात्मिक क्षेत्रातील दिर्घायू रत्न हरपले ▪ आज शांतीवनात अत्यंसंस्कार

**आबू रोड, दि.९, महासागर प्रतिनिधी**: प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या मुख्य प्रशसिका राजयोगीनी ब्रह्माकुमारी रतनमोहिनीजी यांचे दि. ८ एप्रिल रोजी सकाळी १.२० वा. अहमदाबाद येथील जायडस हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार दि. १० एप्रिल रोजी सकाळी १० वाजता ब्रह्माकुमारीज् शांतीवन येथे करण्यात येतील.

ब्रह्माकुमारी रतनमोहिनीदादी गेल्या दोन दिवसांपासून श्वासाच्या त्रासामुळे अस्वस्थ्य होत्या. त्यांना तातडीने अहमदाबाद येथील जायडस हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. वैद्यकिय टीमने शर्थीचे प्रयत्न केले तथापि, त्यांनी प्राणत्याग केले. **दिघार्यु दादी रतन मोहिनीजी** : राजयोगाच्या नियमित साधक असलेल्या ब्रह्माकुमारीज् संस्थेच्या प्रमुखपदी असलेल्या दादींचे वय १०१ वर्षे होते. शेवटपर्यंत त्यांची प्रकृती स्वस्थ्य होती. अनुशासन आणि संयमीत जीवन जगलेल्या दादीजींनी देश-विदेशातील लाखों व्यक्तिंच्या जीवनात मूल्यसंस्कार रुजविलेत, जगातील सर्वात मोठ्या आध्यात्मिक संस्थेचे नेतृत्व करीत असूनही हसतमुखाने आणि मधुरवाणीने त्यांनी लाखों राजयोगी परिवारांना कुटुंबप्रमुखाचे प्रेम दिले. अंत्यसंस्कार शांतीवन येथे ज्या भूमीत त्यांनी देशविदेशातील व्यक्तिंना जीवनाची दिशा दाखविली अशा आबूरोड येथील पवित्र शांतीवन येथे त्यांचे अंत्यसंस्कार १० एप्रिल रोजी सकाळी १० वाजता होणार आहेत. तत्पूर्वी ८ एप्रिल रोजी शांतीवन येथील



सभागृहात त्यांच्या पार्थीवाचे दर्शन अनेकांनी घेतले. ९ एप्रिल रोजी ब्रह्माकुमारीजचे सर्व प्रमुख वास्तु पांडव भवन येथील बाबांचा कमरा, शांती स्तंभ, बाबा कुटीया, हिस्ट्री हॉल या आध्यात्मिक चार धाम येथे दर्शनार्थ नेण्यात येईल. तसेच ओमशांती भवन, ज्ञानसरोवर, पीसपार्क येथून परत शांतीवन येथील कॉन्फ्रेन्स हॉल येथे अंतिम दर्शनार्थ ठेवण्यात येईल. **देश-विदेशातून शोक संवेदना:** दादी रत्नमोहिनी यांचे आध्यात्मिक प्रभामंडळाने देश विदेशातील प्रत्येक देशात आध्यात्मिक साधक वर्ग होता. त्याचप्रमाणे राजकिय, शैक्षणिक, सामाजिक, आध्यात्मिक आणि इतर क्षेत्रातील मान्यवर शोक संवेदना व्यक्त करीत आहेत. असे डॉ. सोमनाथ वडनेरे* महाराष्ट्रराज्यमाध्यमसमन्वयक, ब्रह्माकुमारीज् मीडिया प्रभाग यांनी कळविले आहे.

# जिल्ह्यात क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी संघटनांनी सहकार्य करावे -जिल्हाधिकारी विकास मीना

▪ क्रीडा संघटनांसोबत जिल्हाधिकाऱ्यांची बैठक



**यवतमाळ, दि.९, महासागर प्रतिनिधी**: जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्राला वाढविण्यासोबतच उत्तम क्रीडा संस्कृती निर्माण करण्यास प्रचंड संधी आहे. त्यामुळे विविध खेळाच्या क्रीडा संघटनांनी जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडू राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचविण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे. क्रीडा सुधारणांसाठी सूचना असल्यास सादर कराव्या, असे जिल्हाधिकारी विकास मीना यांनी सांगितले. क्रीडा क्षेत्राला गती देण्यासाठी जिल्हाधिकारी विकास मीना यांनी जिल्ह्यातील विविध खेळांच्या संघटना व त्यांच्या पदाधिकाऱ्यांसोबत जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे बैठक घेतली. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीला जिल्हा क्रीडा अधिकारी घनश्याम राठोड, प्राथमिक शिक्षणाधिकारी प्रकाश मिश्रा तसेच विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. खेळाडू आपल्या परीने मेहनत करतात. त्यांना अधिक चांगले मार्गदर्शन, सुविधा उपलब्ध करून दिल्यास ते आपले व जिल्ह्याचे नाव देखील रोषण करू शकते. त्यामुळे चांगले मार्गदर्शन, मार्गदर्शक व पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर भर राहणार आहे. जिल्ह्यात उत्तम खेळाडू निर्माण करण्याची क्षमता आहे. आपल्याला सर्व मिळून थोडे अधिक प्रयत्न करण्याची गरज आहे. प्रशासन यासाठी विशेष लक्ष देणार असून संघटनांनी देखील सहकार्य करावे, असे जिल्हाधिकारी म्हणाले. खेळाडूंना आपले गाव, देशाचे नाव मोठे करण्याची संधी असल्याची भावना त्यांच्यात निर्माण करा. त्यांच्या खेळाचा कल ओळखून योग्य मार्गदर्शन करा. आवश्यकते प्रमाणे सुविधा आणि प्रशिक्षण उपलब्ध करून द्या. प्राथमिक स्तरावर मुलांच्या चाचण्या घेतल्यानंतर त्यांच्यातील कौशल्य पाहून त्यांना उच्च दर्जाचे प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जातील. राज्य आणि राष्ट्रीय स्तरासाठी निवड झालेल्या खेळाडूंवर विशेष लक्ष केंद्रीत करून खेळाडू उच्च पातळीवर कशा प्रकारे यश संपादन करू शकतील, यासाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचे जिल्हाधिकारी म्हणाले. खेळांसाठी क्लस्टर स्तरीय प्रशिक्षण व सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. त्यासाठी जिल्ह्यातील कोणत्या भागात कोणता खेळाचे क्लष्टर करता येतील, याची शक्यता पडताळा. एकाच ठिकाणी एका खेळासाठी नजीकच्या सर्व विद्यार्थ्यांना मैदान व उत्तम प्रशिक्षक उपलब्ध करून देऊ. यासाठी कालमर्यादा निश्चित करणे आवश्यक आहे. येत्या सहा महिन्यात ही प्रक्रीया पुर्ण करू. एक ते दीड वर्षात चांगले रिझल्ट यापासून मिळतील, असे नियोजन करण्याच्या सूचना क्रीडा विभाग व संघटनांना त्यांनी केल्या. जिल्ह्यात चांगल्या क्रीडा सुविधा निर्माण झाल्या आहे. काही सुविधा नव्याने निर्माण करतो आहे. या सुविधांचा पुर्ण क्षमतेने वापर होणे आवश्यक आहे. जिल्ह्यात होणाऱ्या क्रीडा स्पर्धांचे वेळापत्रक निश्चित करण्याच्या सूचना देखील जिल्हाधिकाऱ्यांनी केल्या. विविध क्रीडा संघटनांचे डॉ. उल्हास नंदुरकर, प्रदीप गाबडा, गिरीश टोपरे, शिव ओम मोर, अनुपम मिश्रा, मनिषा आकरे, किरण फुलझेले, गौतम निंबाळकर, संजय सातारकर, डॉ.प्रा.आनंद भुसारी, प्रा.डॉ. विकास टोणे, अशोक राऊत, अनंत पांडे, राजू जॉन, ताराचंद चव्हाण, मंगेश गुडधे, सचिन हरणे, अविनाश लोखंडे आदी उपस्थित होते.

# कर्मचाऱ्यांनी केली 'त्या' परिपत्रकाची होळी

**यवतमाळ, दि.९, महासागर प्रतिनिधी**: राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाचे कार्यालय जिल्हा परिषदेकडे हस्तांतरण करण्याचे शासनाचा दिनांक २२ नोव्हेंबर चा शासन निर्णय हिवताप कर्मचाऱ्यांनी अमान्य करीत या निर्णयाला विरोध करण्यासाठी हिवताप कर्मचाऱ्यांनी शासनाच्या परिपत्रकाची होळी करून आज एक दिवसीय धरणे आंदोलन हिवताप कर्मचाऱ्याकडून करण्यात आले.




येथील हिवताप कार्यालय परिसरामध्ये हिवताप निर्मूलन कर्मचारी संघटना समन्वय समितीच्या वतीने ९ एप्रिल ला सभा घेण्यात आली होती या सभेमध्ये सर्व केडर निहाय कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला होता या सभेत कर्मचाऱ्यांनी शासनाच्या त्या आदेशाचा निषेध केला हिवताप योजनेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवा विषय बाबी जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित केल्याने प्रशासकीय कार्यात एक सूत्रता राहणार नाही ही योजना स्वतंत्रपणे न राबविल्यास जनतेला सुयोग्य परिणामकारक आरोग्य सेवा पुरविल्या जाणार नाहीत ही बाब लक्षात घेता काढण्यात आलेले अन्यायकारक परिपत्रक रद्द करून ही यंत्रणा स्वतंत्र ठेवून अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अधिकार अबाधित ठेवावे अशी मागणी करण्यात आली आहे.

हिवताप कर्मचारी समन्वय समितीचे अध्यक्ष सुभाष वानरे कार्याध्यक्ष रवी खडसे सरचिटणीस दिलीप मेश्राम, आशिष देशमुख, प्रकाश मुडानकर, रितेश भगत, अनिल परचाके, धनंजय मेश्राम, धीरज पिसे, रवी रामेकर , जुमनाके, निलेश मुळे, मुन्ना शुक्ला, अमोल सोनार, दिनेश माहुरे, राजेंद्र दवे, सुवर्णा सप्रे, व इतर सर्व पदाधिकारी कर्मचारी या आंदोलनात उपस्थित होते.

## भूमापन दिवस जनजागृतीने साजरा

**पुसद**: येथील भुमी अभिलेख कार्यालयाच्या वतीने 'भूमापन दिनानिमित भुमी अभिलेख विभागातील आधुनिक कामकाजा



बाबत जनजागृती करुन हा दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष महादेव जोरवर तहसीलदार तर प्रमुख पाहुणे ॲड.रमेश पाटील तसेच अशोक राठोड उपअधीक्षक भूमी अभिलेख, उपस्थित होते. मान्यवरांचे हस्ते मोजणी साहित्याचे पुजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुरेश राठोड शिरस्तेदार उपअधीक्षक यांनी केले. या कार्यक्रमात ग्राम विकास विभाग, महसुल विभाग व भूमि अभिलेख विभागाकडून राबविण्यात येणा-या स्वामीत्व योजना, ई मोजणी, आज्ञावली, ई फेरफार, अत्याधुनिक ममजणी यंत्र राव्हर, व पारंपारीक मोजणी पध्दत आधुनिक पध्दती बाबत जनजागृती करण्यात आली. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्या करीता अविनाश सरोदे, सुरेश राठोड, आशिष देशमुख, संतोष काजळे, वालाप्रसाद पांड, अरुण राठोड, विनाद कावळे, अशांक ढाल, राजु तिळवं, अमोल गंगासागर, साहेबराव गव्हाण, अमित पांडे, चिपळे, निलेश साखरे, सचिन धोपे, श्रीमती वहिदा पठाण व मिलिंद सोनटक्के यांनी सहकार्य केले.

## संविधानाचा सन्मान आणि जागृती

**यवतमाळ** : : समता पर्व प्रतिष्ठान यवतमाळच्या वतीने, ॲडव्होकेट सीमा तेलंगे यांच्या मार्गदर्शनात "संविधान सन्मान रॅली" चे आयोजन करण्यात



आले. ही रॅली समता मैदान येथून सुरू होऊन हनुमान आखाडा, सिटी पोलीस स्टेशन, संविधान चौक, जिल्हा सत्र न्यायालय आणि पुन्हा समता मैदान इथपर्यंत भव्य स्वरूपात पार पडली. विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जिजाऊ माँसाहेब आणि माता रमाई यांच्या भूमिका साकारून समाजप्रबोधनाचं कार्य केलं.

# ईव्हीएम विरोधात राष्ट्रव्यापी जेलभरो

**यवतमाळ, दि.९, महासागर प्रतिनिधी**: भारत मुक्ती मोर्चा आणि राष्ट्रीय पीछेडावर्ग ओबीसी यांच्यावतीने बुधवारी (ता.९) येथील संविधान चौकात शेकडो कार्यकर्त्यांनी ईव्हीएम विरोधात राष्ट्रव्यापी जेलभरो आंदोलन करून स्वतःला अटक करून घेतली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर आंदोलनकर्त्यांनी आंदोलन करून ईव्हीएम हटाव, देश बचाव अशी मागणी केली. भर दुपारी दोन वाजता च्या दरम्यान भारत मुक्ती मोर्चा राष्ट्रीय पिछडावर्ग मोर्चा भारतीय बेरोजगार मोर्चा बुद्धिस्ट इंटरनॅशनल नेटवर्क बहुजन क्रांती मोर्चा छत्रपती क्रांती सेना, महाराष्ट्र टिपू सुलतान सेना, राष्ट्रीय आदिवासी एकता परिषद या विविध संघटनेच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन राष्ट्रव्यापी जेलभरो आंदोलनात सहभाग घेतला यामध्ये आंदोलनकर्त्यांची ईव्हीएम हटाव संविधान बचाव, ईव्हीएम लोकतंत्र बचाव ओबीसी की जाती आधारित जनगणना करो याशिवाय नवीन शिक्षण निती २०२० तात्काळ रद्द करावी अशा मागण्या करण्यात आले आहे. आंदोलनकर्त्यांनी देश हमारा, राज तुम्हारा नहीं चलेगा, नहीं चलेगा अशा घोषणा देत आंदोलनाला सुरुवात केली या आंदोलनामध्ये महिला विद्यार्थी शेतकरी शेतमजूर कामगार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**SMFG IndiaCredit** | **एसएमएफजी इंडिया क्रेडिट कंपनी लि.**

नोंदणीकृत कार्यालय: कॉमर्सझोन आयटी पार्क, टॉवर बी, पहिला मजला, क्रमांक १११, माउंट पूनमल्ली रोड, पोरूर, चेन्नई ६००११६, तमिळनाडू.
कॉर्पोरेट ऑफिस: टॉवरचे तळमजले - ए, टॉवर - बी आणि टॉवर - सी, टॉवरचा पहिला मजला - ए आणि टॉवरचा अकरावा मजला - सी, दूतावास २४७ (पार्क) लाल बहादूर शास्त्री मार्ग विक्रोळी पश्चिम, मुंबई-४०००८३, महाराष्ट्र | CIN No. : U65191TN1994PLC079235
namaste@smfgindia.com www.smfgindia.com

**ज्याला त्याची चिंता असू शकते**

१५ जुलै २०२५ पासून आम्ही खालील शाखेचे कामकाज कामकाजाच्या आवश्यकतेसाठी बंद करत आहोत हे कळविण्यात येते

शाखेचे नाव: पांढरकवडा ग्रामीण केंद्र पोस्टल पत्ता: प्रभाग क्रमांक १४, मालमत्ता क्रमांक-२४४, शिट क्रमांक ११डी, तळमजला, सिंघानिया नगर, चालबर्डी रोड, पांढरकवडा, केळापूर - ४४५३०२, महाराष्ट्र.

१५ जुलै २०२५ पासून या शाखेशी जोडलेल्या ग्राहकांना आणि इतरांना खालील शाखेकडून सेवा मिळावी यासाठी आम्ही पर्यायी व्यवस्था केली आहे.

शाखेचे नाव : घाटंजी ग्रामीण केंद्र पोस्टल पत्ता: २/५९७, पहिला मजला, प्रभाग क्रमांक २, जगदंबा नगरी, पंजाबी हॉटेल समोर, घाटंजी, ता: घाटंजी, यवतमाळ, महाराष्ट्र-४४५३०१.

एसएमएफजी इंडिया क्रेडिट कंपनी लिमिटेड साठी
अधिकृत स्वाक्षरी

# गाळमुक्त धरण जनजागृती रथाचा जिल्हाधिकाऱ्यांच्याहस्ते शुभारंभ

**यवतमाळ, दि.९, महासागर प्रतिनिधी**: मृद व जलसंधारण विभागाच्यावतीने गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार तसेच नाला खोलीकरण व रुंदीकरण या दोन महत्वाकांक्षी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेच्या जनजागृती रथाचा शुभारंभ आज जिल्हाधिकारी विकास मीना यांच्याहस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात झालेल्या या शुभारंभाप्रसंगी जिल्हाधिकाऱ्यांसह अतिरिक्त जिल्हाधिकारी अनिल खंडागळे, निवासी उपजिल्हाधिकारी सुदर्शन गायकवाड, जिल्हा परिषद लघुसिंचन विभागाचे कार्यकारी अभियंता श्री.पांडे आदी उपस्थित होते. तलावांमध्ये साठलेला गाळ काढून शेतात पसरविल्यामुळे जमीनीची सुपिकता वाढते. हा गाळ शेतकऱ्यांना उपलब्ध करून



देण्यासाठी शासनाने गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार ही योजना सुरु केली. सोबतच नाला खोलीकरण व रुंदीकरण ही योजना देखील राबविण्यात येत आहे. दोनही योजना आता कायमस्वरूप राबविल्या जात आहे. गाळमुक्त धरण योजनेद्वारे गाळ काढण्यासाठी यंत्रसामुग्री व इंधनाचा खर्च शासनाच्यावतीने केला जातो. तलावातून काढलेला सुपिक गाळ शेतात टाकण्यासाठी अल्प व अल्पभूधारक शेतकरी, विधवा, अपंग शेतकरी व आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियास अनुदान दिले जाते. अनुदानाच्या लाभासाठी एक हेक्टर क्षमतेपर्यंत सीमांत, अल्पभूधारक व एक ते दोन हेक्टरपर्यंतचे लहान शेतकरी पात्र आहे. विधवा व अपंग शेतकरी तसेच आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे कुटुंबिय अधिक जमीन धारण करीत असले तरी पात्र आहेत. जिल्ह्यात या दोनही योजनेच्या जनजागृतीसाठी विशेष चित्ररथ काढण्यात आला आहे. सलग १५ दिवस हा चित्ररथ जवळजवळ जिल्ह्यातील २०० गावांमध्ये योजनेचे महत्व समजावून सांगण्यासोबतच मृद व जलसंधारणाचा जागर करणार आहे. चित्ररथास हिरवी झेंडी दाखविल्यानंतर रथ पुढे रवाना झाला.

परिशिष्ट-१

महाराष्ट्र शासन

**उपविभागीय कृषि अधिकारी पुसद ता. पुसद जि. यवतमाळ यांचे कार्यालय**

पत्ता :- विठाबाई नगर, नंदादिप इमारत मामा चौक वाशिम रोड पुसद ता पुसद जि यवतमाळ

ई मेल sdaopusad116@gmail.com दुरध्वनी क्र/फॅक्स क्र ------ (जलयुक्त शिवार अभियान 2.0)

**ई निविदा सुचना क्रमांक B-1/115/2024-25/SA/SDAO.PUSAD-Dt. 9.4.2025 सन 2024-2025**

उपविभागीय कृषि अधिकारी पुसद महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाकडुन **सार्वजनिक बांधकाम विभाग, यांचेकडील नोंदणीकृत ठेकेदाराकडुन** खालील मृद संधारणाच्या क्षेत्र/नाला उपचाराच्या कामा करीता ई निविदा प्रणालीव्दारे ऑनलाईन निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatender.gov.in येथुन डाउनलोड करण्यात यावी. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार उपविभागीय कृषि अधिकारी पुसद / जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यवतमाळ यांनी राखुन ठेवला आहे ठेकेदाराने अटी व शर्ती असलेली निविदेमधील समाविष्ट कामाचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ. क्र. | गावाचे व तालुक्याचे नाव | कामाचे नाव गट क्रमांक | निविदेची अंदाजित रक्कम (लाख) | कामे पुर्ण करण्याचा कालावधी (दिवस) | निविदा फी (रु) | इसारा रक्कम (रु) | कोरे निविदा संच विक्रीसाठी उपलब्ध कालावधी | ठेकेदाराचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | आडगाव | कंपोझिट गॅबीयन स्ट्रक्चर गट क्र 1/1 ते 1/5 | 3017301 | 30 | 590 | 30173 | 9.4.2025 23.4.2025 | 5 व त्यावरील सर्व |

निविदा पुर्व बैठकः- दिनांक 17.4.2025,
बैठकीचे ठिकाण :- उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय, नंदादिप इमारत वाशिम रोड पुसद ता पुसद जि यवतमाळ,
वेळः- 1.00 वाजता
ई निविदा उघडणे दिनांक :- 24.4.2025

स्वा/-
**(अक्षय म. गोसावी)**
उपविभागीय कृषि अधिकारी,
पुसद

**जिमाका /यवत/जाहि/28/2025**

### धनादेश अनादर; एक वर्षाची शिक्षा

**दारव्हा:** धनादेश अनादर प्रकरणी आरोपीला एक वर्षाचा सश्रम कारावास आणि एक लाख ८० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावण्यात आली. हा निकाल येथील प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी ए. ए. पुंड यांनी दिला. चंद्रकांत पवार (रा. सायखेडा) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपीने गजानन नरडे (रा. दारव्हा) यांच्याकडून मित्रत्वापोटी हातउसने म्हणून ९० हजार रुपये घेतले होते. तसेच सदर रक्कम चार ते पाच महिन्यांच्या आत परत करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर नरडे यांनी पैशाची मागणी केली असता, आरोपीने त्यांना धनादेश दिला. मात्र, तो धनादेश खात्यात अपुरी रक्कम असल्याने अनादरीत झाला. त्यानंतर रक्कम देण्यास टाळाटाळ केल्याने न्यायालयात प्रकरण दाखल करण्यात आले. फिर्यादीच्या वतीने ॲड. सचिन गोरले यांनी बाजू मांडली.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमीत्त समता सप्ताह

## ▪ सप्ताहात विविध कार्यक्रमाचे आयोजन

**यवतमाळ, दि.९, महासागर प्रतिनिधी:** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्यावतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने सामाजिक समता सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहानिमित्त शिबीर, समता दिंडी व विविध उपक्रम आयोजित करण्यात आले असून त्याचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

समता सप्ताहाचे उद्घाटन उपायुक्त तथा जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या सदस्य प्राजक्ता इंगळे यांच्याहस्ते झाले. यावेळी बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक ओमप्रकाश नगराळे, समाज कल्याणच्या सहाय्यक आयुक्त मंगला मुन उपस्थित होते. यावेळी प्रत्येक विभाग प्रमुखांनी त्यांचा योजनांची माहिती दिली. योजना फलकाचे माहिती दालन सामाजिक न्याय भवन येथे सुरु करण्यात आले असून ते सर्वांसाठी उपलब्ध आहे.



सप्ताहानिमित्त दि.९ एप्रिल रोजी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांच्या अंतर्गत असलेल्या सर्व शासकीय वसतीगृहे व निवासी शाळांमध्ये विद्यार्थ्यांशी संवाद या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दि.१० एप्रिल रोजी सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदिप कांबळे यांच्या मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रत्येक तालुकास्तरीय शहरी व ग्रामीण भागामध्ये समतादुतामार्फत पथनाट्य व लघुनाट्यांच्या माध्यमातुन संविधान जनजागृती करण्यात येईल.

दि.११ एप्रिल रोजी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीबा फुले यांच्या जयंतीनिमीत्ताने रक्तदान शिबीर व महिला उद्योजकता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून मेळाव्यात महिलांना उद्योजकता या विषयाचे मार्गदर्शन करण्यात येईल. दि.१२ एप्रिल रोजी निवासी शाळा व वसतीगृहांमध्ये संविधान जागर- भारतीय संविधानाविषयी सर्वसाधारण माहिती व संविधानाची निर्मीती याविषयी व्याख्यान आयोजिक केले आहे.दि.१३ एप्रिल रोजी समाजिक समता सप्ताह अंतर्गत कापरा येथील वस्तीमध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. दि.१४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमीत्त अभिवादन कार्यक्रम व योजनेतील लाभार्थ्यांना साहित्य, प्रमाणपत्राचे वाटप करण्यात येणार आहे. समता सप्ताहानिमित्त आयोजित विविध कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन समाजकल्याणच्या सहाय्यक आयुक्त मंगला मून यांनी केले आहे.

## समता सप्ताहानिमित्त ज्येष्ठ नागरिकांची आरोग्य तपासणी



**यवतमाळ, दि.९, महासागर प्रतिनिधी:**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्यावतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त समता सप्ताह राबविण्यात येत आहे. सप्ताहांतर्गत आर्णी तालुक्यातील उमरी पठार येथे संत श्री दोला महाराज वृद्धाश्रमात ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. समता सप्ताहाअंतर्गत रोज विविध कार्यक्रम घेतले जात आहे. त्यात वेगवेगळ्या प्रकारची शिबीरे, समता दिंडी व विविध उपक्रमांचा समावेश आहे. त्याअंतर्गत जागतिक आरोग्य दिनानिमित्त व समता सप्ताहाच्या निमित्ताने संत श्री दोला महाराज वृध्दाश्रमात ज्येष्ठ नागरिकांची आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात एकून १६५ वृध्दांची तपासणी आरोग्य अधिकारी डॉ. निलेश उके, डॉ राठोड व त्यांच्या चमुने केली.

## भरडधान्य विक्रीसाठी ऑनलाईन नोंदणी आवश्यक

**यवतमाळ :** रब्बी पणन हंगामांतर्गत राज्यात किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत ज्वारी, बाजरी, मका व रागी या भरडधान्य खरेदीसाठी जिल्ह्यातील महागाव, पांढरकवडा, झरी , पुसद, आर्णी, राळेगांव, कळंब, घाटंजी व उमरखेड या नऊ तालुक्यात खरेदी केंद्र सुरु करण्यात आले आहे. भरडधान्य खरेदीसाठी दि.३० एप्रिल पर्यंत नोंदणी करणे आवश्यक आहे. खरेदी केंद्रांमध्ये तालुका खरेदी विक्री समिती महागांव, तालुका खरेदी विक्री समिती पांढरकवडा, झरी तालुक्यात बळीराजा फळे फुले भाजीपाला कृषी उत्पादन पणन व प्रक्रिया सहकारी संस्था पाटण, पुसद तालुक्यात किसान मार्केट यार्ड शेलु (बु), पुसद, आर्णी तालुक्यात शेतकरी कृषी खाजगी बाजार दत्तरामपुर, आर्णी, तालुका खरेदी विक्री समिती राळेगांव, तालुका खरेदी विक्री समिती कळंब, तालुका खरेदी विक्री समिती घाटंजी व तालुका खरेदी विक्री समिती उमरखेड या केंद्रांचा समावेश आहे. जिल्ह्यातील ज्वारी, बाजरी, मका व रागी खरेदीकरिता ऑनलाईन नोंदणी दि. ३० एप्रिल पर्यंत करण्यात येणार असुन प्रत्यक्षात भरडधान्य खरेदी दि. १ मे ते ३० जुन पर्यंत करण्यात येणार आहे. त्यासाठी शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्र आधारकार्ड, बँकेचे पासबुक, पॅनकार्ड, सातबारा, चालु पिकपेरा सुस्पष्ट झेरॉक्स प्रत संबंधित खरेदी केंद्रावर देवून भरडधान्य खरेदीसाठी नोंदणी करण्याचे आवाहन जिल्हा मार्केटिंग अधिकारी अर्चना माळवे यांनी केले आहे.

## भीमराव पांचाळे यांची महागावात गजल मैफील शुक्रवारी

**महागाव:**गजलनवाज पंडित भीमराव पांचाळे आणि डॉ. भाग्यश्री पांचाळे गायकवाड यांची 'आयुष्याचे सार गजल' ही गजल मैफील



महागाव शहरात शुक्रवारी (ता. ११) आयोजित करण्यात आली आहे. महागाव तालुका पत्रकार महासंघाच्या वतीने महागाव येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रांगणात सायंकाळी सात वाजता कार्यक्रम आयोजित केला आहे.महागाव येथील ज्येष्ठ पत्रकार तथा गजलकार गजानन वाघमारे यांच्या 'भुकेचा केंद्रबिंदू' या गजल संग्रहाचे प्रकाशन यावेळी करण्यात येणार आहे. तहसीलदार अभय म्हस्के यांचा गौरव करण्यात येणार आहे. आमदार किसन वानखेडे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत. माजी शिक्षण मंत्री वसंतराव पुरके, भाजपचे जिल्हा समन्वयक नितीन भुतडा, माजी आमदार विजय खडसे, माजी आमदार राजेंद्र नजरधने, माजी आमदार नामदेव ससाने, काँग्रेसचे नेते साहेबराव कांबळे, उपविभागीय पोलिस अधिकारी हनुमंतराव गायकवाड कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहे. प्रवेश विनामूल्य असून श्रोत्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन महागाव तालुका पत्रकार महासंघाच्या वतीने करण्यात आले आहे. भीमराव पांचाळे मागील पन्नास वर्षांपासून मराठी गजल गात आहेत. देश-विदेशात त्यांचे लाखो चाहते आहेत. मराठी गजल लिहिणारी नवी पिढी तयार व्हावी यासाठी त्यांनी आजवर शेकडो गजल मुशायरे आणि कार्यशाळा घेतल्या आहेत.

## लोकमित्र डॉ. जयस्वाल



दलितमित्र डॉ. के.जी. जयस्वाल

डॉ. के. जी. जयस्वाल हे गुरुकुंज आश्रमाच्या परिसरात एक आदर्श सेवक आणि तपस्वी वृत्तीचे धन्वंतरी म्हणून प्रख्यात होते. औषधापेक्षा सुश्रुषेवर त्यांचा भर अधिक होता. सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीमुळे ज्यांच्या वाट्याला रोग येतात पण औषधे येत नाहीत अशा दुर्दैवी जीवांसाठी तर डॉ. जयस्वाल हा एक मोठा आधारस्तंभ होता. अशा असहाय्य रुग्णांची सेवा हीच ईश्वराची पूजा ही त्यांची आध्यात्मिक धारणा होती.

डॉ.जयस्वाल राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना गुरुस्थानी मानत. त्यांचे साहित्य, त्यांची भजने, त्यांची भाषणे हि सर्व त्यांची प्रेरणास्थाने होती. राष्ट्रसंतांची आज्ञा पाळण्यात त्यांना ईश्वर प्राप्तीचा आनंद होत असे. त्यांच्या साहित्याचा प्रसार-प्रचार करण्यात त्यांना जीवनाची कृतकृत्यता वाटत असे.

डॉ. जयस्वाल यांचा जन्म अकोला जिल्ह्यातील बोर्डी या खेड्यात झाला. १९२३ हे त्यांचे जन्मवर्ष. वास्तविक डॉ. जयस्वाल हे जातीने कलाल दारू गाळणे आणि विकणे हा त्यांचा पिढीजात उद्योग, पण डॉक्टरांचे कुटुंब याला अपवाद होते. अगदी सुरुवातीपासूनच त्यांचे सर्व कुटुंब सुसंस्कृत व भक्तीमार्गी होते. या विशिष्ट पार्श्वभूमी मुळे डॉक्टरांचा ओढा बालपणापासूनच सुसंस्काराकडे, डॉक्टर होऊन लोकांची सेवा करण्याकडे आणि उत्तम शिक्षण घेण्याकडे राहिला. विद्यार्थी दशेत त्यांनी उत्तम अध्ययन केले आणि डी. ए. एस. एफ. ही वैद्यक शास्त्रातली महत्वाची पदवी हस्तगत केली. नेत्र-विज्ञानातील सर्वोच्च पदवी त्यांनी मुंबई येथून प्राप्त केली.

शिक्षण पूर्ण झाल्या नंतर त्यांनी बीड येथे दवाखाना सुरु केला. परंतु अशाप्रकारे व्यक्तिगत व्यवसायात फार दिवस डॉक्टरांनी गुंतून पडणे नियतीच्या मनात नसावे. आजाराचे निमित्त होऊन त्यांना बीडचा दवाखाना बंद करावा लागला. बोर्डीला स्वगृही येऊन रहावे लागले.

याच काळात १९५१ साली डॉक्टर जयस्वाल यांना राष्ट्रसंतांचे भजन ऐकण्याचा योग आला. या भजनाने ते अत्यंत प्रभावीत झाले. राष्ट्रसंतांच्या कार्यात आपले जीवन झोकून द्यावे अशी त्यांना प्रेरणा झाली. त्यांनी राष्ट्रसंतांच्या गुरुकुंज आश्रमात सेवा कार्य करण्याचे मनोमन ठरवून टाकले.

डॉ. जयस्वाल हे नामांकित नेत्र शल्य चिकित्सक गुरुकुंज आश्रम परिसराला त्यांच्या निमित्ताने एक उत्तम धन्वंतरी मिळाला. लोकांनी या घटनेचे उत्तम स्वागत केले. राष्ट्रसंतांच्या सांगण्यावरून देणग्यांचा आणि रुग्णांचाही डॉक्टरांवर पाउस पडला. भराभर काम वाढीस लागले. दवाखाना झाला सेवाभावी डॉक्टरांची रीघ लागली. इमारती उभारल्या गेल्या. आवश्यक त्या सर्व सुखसोयी उपलब्ध होऊ लागल्या. दूरदूरचे गरजू रुग्ण या सर्व सेवामय वातावरणाचा फायदा घेऊ लागले. सर्वत्र डॉक्टर जयस्वालांचा बोलबाला होऊ लागला. यातूनच पुढे गुरुकुंज येथील आयुर्वेद महाविद्यालय जन्माला आले. खेड्यापाड्यातील मुलामुलीना डॉक्टर होण्याची सोय या महाविद्यालयामुळे झाली. एकूण गुरुकुंज आश्रमाचा आरोग्य विभाग ही खऱ्या अर्थाने डॉक्टर जयस्वाल यांचे वास्तव स्मारक झाले आहे. राष्ट्रसंतांच्या कृपाछत्राखाली वाढलेला, विकसित झालेला डॉ. जयस्वाल हा सेवेचा नंदादीप या प्रांजळ सेवकाची दखल महाराष्ट्र शासनानेही घेतली आणि त्यांना 'दलितमित्र' म्हणून गौरविले. पण डॉक्टर जयस्वाल यांचा खरा पिंड होता तो अध्यात्माचा. सेवा हे त्यांचे साधन होते. राष्ट्रसंताना त्यांनी गुरुस्थानी मानले होते. त्यांच्या प्रत्येक आज्ञेचे पालन करणे ही त्यांनी आपल्या जीवनाची इतिकर्तव्यता मानली होती. आणि यामुळे डॉक्टर आपल्या व्यक्तिगत जीवनात अत्यंत सालस, विनम्र आणि सेवाभावी होते. त्याग हा त्यांचा स्थायी भाव होता. स्वत: कडे स्वत:च्या प्रकृतीकडे लक्ष देणे त्यांना कधीच महत्त्वाचे वाटले नाही. त्यामुळे त्यांचे शरीर अनेक व्याधींनी पोखरले. अनेक रोगांचे ते शिकार झाले. आणि अक्षम्य दुर्लक्षामुळे ते अल्पायुष्यात ईश्वर चरणी लीन झाले.

डॉ.जयस्वाल यांच्या संपूर्ण जीवनाचा स्थायीभाव परोपकार, सेवा, भक्ती हा होता. त्यामुळे स्वत: जळणे आणि इतरांना सुगंध देणे त्यांच्या साठी क्रमप्राप्त होते. ते व्रत त्यांनी निष्ठेने व इमानदारीने सांभाळले आणि म्हणूनच गुरुकुंज आश्रमाच्या परिसरात आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या जीवन-कार्यात डॉक्टर जयस्वाल जळीस्थळी, काष्टीपाषाणी भरून उरले. प्रत्येक ठिकाणी डॉ. जयस्वाल स्मृती रूपाने अस्तित्वात आहेत. हीच त्यांच्या सेवामय जीवनाची खरी कृतार्थता होय. डॉ. जयस्वाल यांचे स्मरण म्हणजे नि:स्वार्थ सेवेचे स्मरण. निष्काम कर्मयोगाचे स्मरण. आदर्श भक्ताचे स्मरण. वारा ज्या प्रमाणे आकाशात सर्वत्र भरून असतो पण नजरेला कुठेही जाणवत नाही त्या प्रमाणे डॉ. जयस्वाल यांचे या परिसरातील अस्तित्व आहे. आणि म्हणूनच म्हणावेसे वाटते की डॉ. जयस्वाल हे राष्ट्रसंतांच्या विशाल सेवाकार्यासाठी अदृश्य प्राणवायू आहेत. अमूर्त प्रेरणाशक्ती आहेत!

**बाबा मोहोड** ज्येष्ठ साहित्यिक

## ग्रामीण आंबेडकरी साहित्य संमेलनाचे आयोजन

### ▪ संमेलनाध्यक्षपदी डॉ. नंदा तायवाडे तर उद्घाटक प्रा. विलास भवरे





**यवतमाळ, दि.९, महासागर प्रतिनिधी:** अ. भा. आंबेडकरी साहित्य व संस्कृती संवर्धन महामंडळाचे सहावे ग्रामीण आंबेडकरी साहित्य संमेलन हिवरा (बु), ता. नांदगाव खंडेश्वर येथे दिनांक ११ एप्रिल रोजी आयोजित करण्यात येणार आहे. संमेलनाध्यक्षपदी डॉ. नंदा तायवाडे तर उद् घाटकपदी प्रा. विलास भवरे यांची निवड करण्यात आल्याची माहिती महामंडळाचे निमंत्रक प्रशांत वंजारे यांनी दिली आहे. अलिकडच्या दशकात ग्रामीण भागातील समस्यांनी उग्र रूप धारण केले असून सामान्य ग्रामीण माणूस हतबल झाला आहे. ग्रामीण माणसांच्या असंतोषाला संघटित स्वरूप देऊन त्याला विधायक वळण देणे गरजेचे आहे. याकामी साहित्य हे महत्त्वाची भूमिका बजावू शकते. ग्रामीण परिसरातील सर्जनशीलता वाढीस लागावी, ग्रामीण कलावंतांना विचारमंच उपलब्ध व्हावा आणि सरकारी अनास्थेमुळे ग्रामीण भागात निर्माण झालेल्या समस्यांवर चर्चा व्हावी यासाठी सदर संमेलनाचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्रशांत वंजारे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे कळवले आहे. संमेलनात दिवसभर भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून त्यात कथाकथन, विधान चर्चा, कवी संमेलन, एकपात्री नाट्य प्रयोग, परिसरातील कार्यकर्त्यांचा सन्मान आदी कार्यक्रमांचा समावेश आहे. संमेलनात डॉ. वामन गवई, डॉ. भास्कर पाटील, डॉ. सिद्धार्थ वाठोरे, प्रा. विक्रांत मेश्राम, भाऊ भोजणे, डॉ सीमा मेश्राम, संजय शेजव आदी मान्यवर सहभागी होणार आहेत. संघर्ष युवक मंडळ हिवरा (बु) ही सदर संमेलनाची आयोजक संस्था आहे. संमेलनाचे स्वागताध्यक्ष रोशन रामटेके असून मुख्य संयोजक नयन मेश्राम आहेत.

## पांढरकवडा येथील पोषण पुनर्वसन केंद्राला प्रथम पुरस्कार




**पांढरकवडा, दि.९, महासागर प्रतिनिधी:** उपजिल्हा रुग्णालय पांढरकवडा येथील पोषण पुनर्वसन केंद्राला राज्य शासनातर्फे आरोग्य सन्मान २०२५ मध्ये प्रथम पारितोषिक जाहीर झाले असून येत्या ७ एप्रिल रोजी जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सभागृहा मध्ये मा. उपमुख्यमंत्री, आरोग्यमंत्री व इतर मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. पांढरकवडा सारख्या आदिवासी बहुल भागातील कुपोषणाचे प्रमाण कमी करून ० ते ५ वर्ष वयोगटतील बालकांमध्ये पोषण वाढण्याच्या उद्देशाने शासनातर्फे उपजिल्हा रुग्णालय पांढरकवडा येथे पोषण पुनर्वसन केंद्राची निर्मिती करण्यात आलेली आहे. तेव्हापासून जवळपास २०४० बालके कुपोषणातून मुक्त होऊन घरी परतली आहे. दिवसेंदिवस केंद्राचा प्रगतीचा आलेख उंचावत असून याआधीही या केंद्रास बरेच पुरस्कार मिळाले आहेत. या केंद्रामध्ये कुपोषित बालकांना त्यांच्या मातेसह १४ दिवसांकरिता भरती ठेवण्यात येऊन वैद्यकीयतज्ञांच्या सल्ल्यानुसार उपचार व आहारतज्ञ यांच्या मार्गदरशनाखाली सकस आहार पुरविण्यात येतो. तसेच मातांना प्रोत्साहनपर भत्ता म्हणून ४२०० रू बुडीत मजुरी देण्यात येते. १४ दिवसाच्या उपचारानंतर रुग्णास शासकीय वाहनाद्वारे घरी पोहचविण्यात येते. प्रथम पुरस्कार मिळाल्याबदल रुग्णालयाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून या यशाकरिता मा. डॉ.कमलेश भंडारी उपसंचालक आरोग्य सेवा, अकोला मंडळ अकोला, मा. डॉ. सुखदेव राठोड जिल्हा शल्य चिकित्सक, यवतमाळ रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षिका डॉ. वैशाली सातुरवार उपजिल्हा रुग्णालय येथील सर्व वैद्यकीय अधिकारी तसेच पोषण पुनर्वसन केंद्राचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

## » संक्षिप्त...

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावरील झाँकीने वेधले लक्ष



**यवतमाळ :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्धी जन्मोत्सव वर्षानिमित्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावरील झाँकी तयार करण्याची परवानगी श्रीराम जन्मोत्सव समितीच्या वतीने दिली. यासाठी उत्सव समितीने ट्रॅकर उपलब्ध करून दिलेला आहे. प्रथमच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची झाँकी श्रीराम जन्मोत्सव शोभायात्रेत दिसल्याने रामभक्तांच्या आकर्षणाचे केंद्र ठरली आहे. यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारक समितीने शोभायात्रा उत्सव समितीचे आभार मानले. यासाठी शोभा पुनसे, मीनाक्षी गाढवे, बाली गायनर, सरला सोडगीर, स्मिता ढेकळे, लता गलाट व त्यांची टीम तयारी केली. याकरिता डॉ. अंजली गवार्ले यांचे मार्गदर्शन लाभले असून पवन थोटे, सुरेश भावेकर, देविदास कांबळे, अमोल शिंदे, सुनील सोडगीर, मनमोहन कापडे, दिनेश टेकाडे, विलास अवघड, प्रदीप पुनसे, राजकुमार लकडे, राजू कुंडगर, नीलेश चामाटे, चारुदत्त पुनसे, अंकुश गलाट यांचे सहकार्य लाभत आहे. शोभयात्रेत सर्वांनी पिवळे वस्त्र परिधान करून सहभागी होण्याचे आवाहन स्मारक समितीतर्फे करण्यात येत आहे.

### 'नंददीप 'ला 'एसएमएस'ची सीएसआर फंडमधून आर्थिक मदत




**यवतमाळ:** बांधकाम क्षेत्रातील एसएमएस लिमिटेड नागपूरकडून समर्थवाडीतील नंददीप बेघर मनोरुग्ण निवारा केंद्राला सीएसआर निधी प्राप्त झाला आहे. २ एप्रिलला कंपनीचे सतीश इनोते, देवाशिष राठा तसेच तृषित इंगोले यांच्या उपस्थितीत केंद्राला कुलर, टीव्ही, फर्निचर तसेच साहित्य सुपूर्द करण्यात आले. धरण, कोलामाइन, रस्ते, रेल्वे रुळांच्या निर्मिती क्षेत्रात काम करणाऱ्या एसएमएस कंपनी लिमिटेड (नागपूर) कडून नंददीपच्या मनोरुग्ण सेवेची दखल घेण्यात आली आहे. कंपनीच्या सीएसआर निधीतून नंददीप बेघर मनोरुग्ण निवारा केंद्रास ५ कुलर, ४३ इंच टीव्ही, २० खुर्च्या तसेच तीन टेबल देण्यात आले. संदीप व नंदिनी शिंदे यांच्या मनोरुग्णसेवेतून समाजाला एक आदर्श मिळतो आहे. त्यांच्या या सेवाकार्यात आमच्या कंपनीकडून पुढेही सहकार्य मिळत राहील, असा विश्वास इनोते यांनी दिला, याप्रसंगी केंद्राचे संदीप शिंदे, भोजराज गजबे, बबन घोडेस्वार तसेच मुरलीधर गबणे उपस्थित होते.

### नेर येथे भाजपा स्थापनादिन



**नेर:** भाजपाच्या वतीने स्थानिक कार्यालयात भाजपा पक्ष स्थापना दिन साजरा करण्यात आला. यावेळी भारत मातेचे पूजन करून भाजपाचा ध्वज फडकविण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात जनसंघाचे संस्थापक डॉ. शामाप्रसाद मुखर्जी, पंडित दीनदयाल उपाध्याय, भाजपाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमांना माल्यार्पण करुन करण्यात आली. यावेळी भाजपाचे माजी अध्यक्ष विलास राखडे, भाजपा शिक्षक आघाडीचे अमरावती विभाग उपाध्यक्ष उदय कानतोडे यांनी मार्गदर्शन केले. शहर भाजपा अध्यक्ष राजेंद्र देऊळकर यांनी कार्यक्रमाचे संचालन केले तर आभार आशिष खोडे यांनी मानले. यावेळी तालुका अध्यक्ष योगेश दहेकर, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष पंजाब शिरभाते, माजी तालुका अध्यक्ष अनिल राठोड, तालुका सरचिटणीस पवन माहूरे, युवा मोर्चाचे माजी अध्यक्ष शहर प्रविण जयस्वाल, शहर सरचिटणीस अजाब चिचोळकर, जिल्हा युवा मोर्चा सरचिटणीस निलेश राठोड, मनिषा पांगारकर, रेणुका जयस्वाल, सोनाली गुल्हाने, छाया नाहले, अश्विन दावडा, दिलेश्वर महल्ले, अशोक खांडरे, कैलास मेहर, संजय खरात, साहेबराव तुपटकर, आशिष खोडे, दिनेश पांगारकर, प्रितम गावंडे, गौरव राऊत, राजु निमकर, जगदीश टिचुकले, संतोष देशमुख आदी सह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. राष्ट्रगीत गायनाने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

### पोहरादेवी यात्रेत बेल-आवळा सरबताचे वितरण



**यवतमाळ:** येथील देवी सामका महिला बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने पोहरादेवी येथे रामनवमीनिमित्त आयोजित यात्रेत बेल व आवळा सरबताचे मोफत वितरण करण्यात आले. उन्हाळ्याच्या तीव्र तापमानात यात्रेकरूंना थोडा गारवा देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. संस्थेच्या सचिव चंदा पवार व संस्थेचे अध्यक्ष यांच्या नेतृत्वाखाली, संस्थेच्या संपूर्ण कार्यसमितीने एकजुटीने अडीचशेहून अधिक यात्रेकरूंना सरबत वाटप केले. या उपक्रमात वापरलेले बेल व आवळा शरबत आरोग्यवर्धक असून ते शरीरात थंडावा निर्माण करतात. तसेच उन्हाळ्यातील उष्माघात, डिहायड्रेशन यांसारख्या त्रासांपासून संरक्षण देतात, यात्रेतील अनेक भाविकांनी या उपक्रमाचे कौतुक करत समाधान व्यक्त केले. संस्था भविष्यातही अशा आरोग्यवर्धक आणि समाजोपयोगी उपक्रमांची मालिका सुरू ठेवणार असल्याचे सामका आयुर्वेद रिचर्स सेंटरचे डॉ. पंकज पवार यांनी सागितले.

: आरएनआय रजिष्ट्रेशन क्रमांक :
-२०१०/३५७९९-

महासागर यवतमाळ

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्णा तन्मुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर-१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, बस स्टँड चौक, होटल प्रकाश जवळ, यवतमाळ येथे प्रकाशित केले. संपादक-श्रीकृष्ण तनमुखदास चांडक मुख्य कार्यालय पोन-०७१२-२७६७६२८-९९२२९७००२३ स्थानिक संपादक-रघुवीरसिंह चौहान फोन-९४२३४३३२४४ (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहिल.)

# नाओमिकाने लक्ष वेधले

राजेश खन्ना आणि डिंपल कपाडिया हे मनोरंजनविश्वातील एक लोकप्रिय दांपत्य. त्यांना दोन मुली आहेत. त्यातील ट्विंकल खन्नाने काही बॉलिवूड चित्रपटांमध्ये काम केले पण अभिनय सोडून लेखिका बनली. दुसरी रिंकी खन्नाला अभिनयात यश मिळाले नाही. तशी ती कायमच प्रसिद्धीपासून दूर गेली. आजकाल तर रिंकी क्वचितच दिसते पण तिची मुलगी नाओमिका सरन मात्र सध्या सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. नाओमिका सरन ग्लॅमरस जगापासून दूर असली तरी ती कधीकधी आजी डिंपल कपाडियासोबत पार्टी किंवा कार्यक्रमात दिसते. प्रत्येक वेळी आपल्या अपूर्व सौंदर्याने ती लोकांचे लक्ष वेधून घेते. अलिकडेच ती डिंपल कपाडियासह 'मॅडॉक फिल्म्स'च्या २० व्या वर्धापन दिनाच्या पार्टीत सहभागी झाली होती. तिने अत्यंत स्टायलिश अवतारात एन्ट्री घेतली. यावेळी ६७ वर्षीय डिंपलने तपकिरी आणि पांढरा रंगाचा ड्रेस घातला होता. मोजक्या स्टेटमेंट ज्वेलरीमध्ये तीही सुंदर दिसत होती. आपल्या देखण्या आजीसह नाओमिका सरन काळ्या रंगाच्या बॉडी हगिंग ड्रेसमध्ये वावरत होती. सोनेरी स्टेटमेंट ज्वेलरी, काळी पर्स आणि काळ्या हिल्सने तिचा लूक सजला होता. मोकळ्या केसांनी आणि चमकदार मेकअपने तिचे सौंदर्य द्विगुणीत होत होते.

हा व्हिडिओ सोशल मीडियावर येताच लोकांनी नाओमिकाच्या सौंदर्याचे आणि हास्याचे कौतुक करायला सुरुवात केली. एकाने म्हटले, 'ती खूप गोंडस आहे' तर एकाने टिप्पणी दिली, 'तिला आजोबांचे डोळे वारशाने मिळाले आहेत.' एकाने तर म्हटले की, ती ट्विंकल खन्नासारखी दिसते. एकूणच लोक रिंकी खन्नाच्या मुलीचे कौतुक करत आहेत.

नाओमिका सरन लवकरच बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार असल्याचीही बातमी आहे. दिनेश विजन 'मॅडॉक फिल्म्स'च्या बॅनरखाली एक रोमॅंटिक-कॉमेडी चित्रपटाची निर्मिती सुरू असून त्यामध्ये नाओमिका मुख्य भूमिकेत असेल. अमिताभ बच्चन यांचा नातू अगस्त्य नंदा तिच्यासह या चित्रपटात बघायला मिळेल.






# 'छोरी २'विषयी उत्सुकता शिगेला



'छोरी २' हा विशाल फुरिया दिग्दर्शित हॉरर चित्रपट प्रेक्षकांसमोर येत आहे. या चित्रपटात नुसरत भरुचा आणि सोहा अली खान मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. याशिवाय सौरभ गोयल, गश्मीर महाजनी, पल्लवी अजय, कुलदीप सरन, हार्दिका शर्मा हे कलाकारही चित्रपटात महत्त्वाच्या भूमिकांमध्ये आहेत. चित्रपटाचे निर्माते भूषण कुमार, विक्रम मल्होत्रा, कृष्ण कुमार आणि जॅक डेव्हिस असून ३० नोव्हेंबर २०२२ रोजी घोषणा करण्यात आलेल्या या चित्रपटाची प्रेक्षकांना प्रतीक्षा होतीच. तेव्हा २०२१ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'छोरी'चा दुसरा भाग कसा असेल हे लवकरच कळेल.

'छोरी २' अमेझॉन प्राइम व्हिडिओवर प्रदर्शित होत असून तो प्रेक्षकांना भयपट आणि सस्पेन्ससह एक रोमांचक अनुभव देईल. यामध्ये लिंगभेद दाखवला आहे. त्यात भावना आहेत तसेच भयानकताही आहे. ट्रेलरच्या सुरुवातीच्या दृश्यात एक महिला लहान मुलीला गोष्ट सांगताना दिसली आहे. त्यात ती म्हणते, 'एक खूप मोठे राज्य होते. एक राजा होता. त्याच्या घरी एका मुलीचा जन्म झाला. राजाला राग आला. त्यावर गोष्ट ऐकणारी मुलगी विचारते, 'तू का रागावलास?' तर रागाचे कारण म्हणजे राजाला मुलगा हवा होता असं महिला सांगते. मग मुलगी आश्चर्याने विचारते, 'पुढे काय झाले?' तर महिला सांगते, 'राजाने दासीला बोलावले...' एकंदर अशी रहस्य निर्मिती करुन चित्रपट कसा पुढे जातो, हे बघणे रंजक ठरेल. ट्रेलरमध्ये सोहा अली खान बुरखा घातलेली दिसली आहे. एकूणच ट्रेलर खूपच भयानक असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले आहे. त्यात दाखवलेली विहीर भीतीची खोल दाखवते. यावेळी कथा आणखी भयानक असल्याचा निर्मात्यांचाही दावा आहे. ट्रेलरला अनेकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने या चित्रपटाविषयी उत्सुकता वाढली आहे.

# 'भरत कुमार'ला भावपूर्ण श्रद्धांजली



गेल्या काही दिवसांपासून मनोरंजन विश्वातून सतत हृदयद्रावक बातम्या येत आहेत. प्रथम ज्येष्ठ अभिनेते मनोज कुमार यांच्या निधनाची बातमी आली. नंतर प्रसिद्ध अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिस यांच्या आईचे निधन झाल्याचे समजले आणि नुकतेच प्रसिद्ध दिवंगत गायक, संगीतकार रवींद्र जैन यांच्या पत्नीनेही जगाचा निरोप घेतल्याची बातमी दुःख वाढवून गेली. दिव्या जैन यांचे नुकतेच निधन झाले. या बातमीने पुन्हा एकदा इंडस्ट्रीत शोककळा पसरल्याचे दिसले.

ज्येष्ठ अभिनेते आणि दिग्दर्शक मनोज कुमार यांना शासकीय सन्मानाने अंतिम निरोप देण्यात आला. मुलगा कुणाल गोस्वामी यांनी, आपल्या वडिलांनी शांततेने जगाचा निरोप घेतल्याचे सांगितले. मनोज कुमार बऱ्याच काळापासून आरोग्याच्या समस्यांमुळे त्रस्त होते. बऱ्याच काळापासून त्यांना यकृत सिरोसिसचा आजार होता. प्रकृती बिघडल्यानंतर २१ फेब्रुवारी २०२५ रोजी त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

रुपेरी पडद्यावर 'भारत कुमार' म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या या ज्येष्ठ अभिनेत्याने मुंबईतील कोकिलाबेन रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. 'उपकार', 'पूरब और पश्चिम', 'क्रांती' आणि 'रोटी-कपडा और मकान' यासारख्या सुपरहिट चित्रपटांसाठी प्रसिद्ध असणाऱ्या या अभिनेत्याच्या निधनाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही शोक व्यक्त केला. मनोज कुमार यांना त्यांच्या चित्रपट कारकिर्दीत सात वेळा फिल्मफेअर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. १९९२ मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते तर २०१६ मध्ये दादासाहेब फाळके पुरस्काराने त्यांचा सन्मान केला होता. आता ते पंचतत्त्वात विलीन झाले असले तरी देशावर नितांत प्रेम करणाऱ्या या देखण्या अभिनेत्याच्या आठवणी कायमच आपल्यासवे राहतील.

# सुरू होणार नवीन अध्याय



सध्या टॉम क्रूझच्या चाहत्यांचा उत्साह प्रचंड वाढला आहे. बऱ्याच दिवसांपासून 'मिशन इम्पॉसिबल: द फायनल रेकनिंग' बद्दलचे अपडेट्स येत असल्यामुळे प्रेक्षकांच्या नजरा चित्रपटाच्या प्रदर्शन तारखेवर खिळल्या होत्या. आता निर्मात्यांनी चित्रपटाचा जबरदस्त ट्रेलर रिलीज केला असून तो सोशल मीडियावर ट्रेंड करत आहे.

'मिशन इम्पॉसिबल: द फायनल रेकनिंग' मध्ये टॉम क्रूझ पुन्हा एकदा इथन हंटच्या भूमिकेत जबरदस्त अॅक्शनसह परतताना दिसत आहे. या दोन मिनिटे १२ सेकंदांच्या ट्रेलरमध्ये साहस, थरार आणि भावनांचा परिपूर्ण समतोल दिसून येतो. ट्रेलरमध्ये टॉम क्रूझ पूर्ण अॅक्शन मोडमध्ये दिसतो. हाय-स्पीड बाईकचा पाठलाग, जबरदस्त स्टंट आणि प्राणघातक मोहिमा ही 'मिशन इम्पॉसिबल'ची ओळख म्हणावी लागेल. मनोरंजक गोष्ट म्हणजे या आयकॉनिक अॅक्शन फ्रँचायझीचा हा शेवटचा भाग मानला जात असल्याने चित्रपटात पूर्वीच्या काही महत्त्वाच्या पात्रांनाही आणले आहे. त्यामुळेच हा ट्रेलर केवळ अॅक्शनने भरलेला नाही तर प्रेक्षकांशी भावनिकदृष्ट्या जोडण्याचाही एक सर्वोत्तम प्रयत्न आहे. ट्रेलरमध्ये चित्रपटाची कथा उघड केलेली नाही. कथानकातील कोणताही मोठा ट्विस्ट किंवा क्लायमॅक्सची कल्पना याद्वारे देण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रेक्षकांची उत्सुकता वाढली आहे. याद्वारे निर्मात्यांनी सस्पेन्स कायम ठेवला असून प्रेक्षकांना थिएटरकडे आकर्षित करण्यासाठी एक मजबूत आधार तयार केला आहे. हा ट्रेलर चाहत्यांसाठी आठवणींनी भरलेली भेट असून ती एका युगाच्या समाप्तीची झलक देते तर दुसरीकडे नवीन उंची गाठण्याचे आश्वासनही देते. हा चित्रपट २३ मे रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

ही आयकॉनिक अॅक्शन फ्रँचायझी खात्रीने चाहत्यांच्या हृदयात स्थान मिळवेल. ही मालिका १९९६ मध्ये सुरू झाली आणि तेव्हापासूनच प्रत्येक चित्रपटाने अॅक्शन, सस्पेन्स आणि थ्रिलची परिभाषा समोर मांडली. त्याच्या चौथ्या भागात बॉलिवूड अभिनेता अनिल कपूरनेही एक खास कॅमिओ केला होता. स्वाभाविकच याने भारतीय प्रेक्षकांना आकर्षित केले होते.

यानंतर फ्रँचायझीचा पाचवा चित्रपट २०१५ मध्ये आणि सहावा भाग २०१८ मध्ये प्रदर्शित झाला. प्रत्येक चित्रपटाबरोबर कथा आणि कृतीचा स्तर वाढत गेला. सातवा आणि आतापर्यंतचा नवीन अध्याय २०२३ मध्ये प्रदर्शित झाला आणि त्याला समीक्षक आणि चाहत्यांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला. आता प्रेक्षक या मिशनच्या ग्रँड फिनालेची आतुरतेने वाट पाहत आहेत.

# रसिकांना न रुचलेली एक्झिट

प्रसिद्ध संगीतकार आणि गायक विशाल दादलानी यांनी अखेर 'इंडियन आयडल'बरोबरचा त्याचा सहा वर्षांचा प्रवास संपवला आहे. या लोकप्रिय गायन रिॲलिटी शोमध्ये त्याने बराच काळ न्यायाधीश म्हणून काम केले. परंतु आता या सीझनच्या शेवटी इंस्टाग्राम पोस्टद्वारे त्याने चाहत्यांना भावनिक निरोप दिला आहे.




विशालने इंस्टाग्रामवर पोस्ट शेअर करून त्याच्या प्रवासाची आठवण काढली. त्यात गायकाने लिहिले, 'अलविदा मित्रांनो. मला या सीझन सहामध्ये आनंद मिळालाच पण त्यापेक्षा जास्त अनेक आठवणी दिल्या. या शोने मला पात्रतेपेक्षा खूप जास्त प्रेम आणि आदर दिला आहे आणि याबद्दल मी नेहमीच आभारी राहीन.' तो पुढे लिहितो, 'मी इंडियन आयडल सोडण्याचे कारण म्हणजे आता मला वेळ परत हवा आहे. मी वर्षातील सहा महिने मुंबईत राहू शकत नाही. तेव्हा आता पुन्हा स्टेजवर येण्याची, संगीत देण्याची आणि लाईव्ह कॉन्सर्ट करण्याची वेळ आली आहे. यापुढे कदाचित पुन्हा कधीही मी मेकअप करणार नाही.'

विशाल दादलानी केवळ प्रसिद्ध संगीतकारच नाही तर 'विशाल-शेखर' जोडीचा भाग म्हणूनही त्याने 'ओम शांती ओम', 'चेन्नई एक्सप्रेस', 'बँग बँग' आणि 'वॉर' सारख्या बॉलिवूडमधील हिट चित्रपटांना संगीत दिले आहे. तसेच तो सामाजिक आणि राजकीय मुद्यांवर उघडपणे विचार व्यक्त करण्यासाठीही ओळखला जातो. विशालच्या शो मध्ये नसण्याने चाहते केवळ दुःखीच झाले नाहीत तर 'इंडियन आयडल'च्या जगात मोठी पोकळी निर्माण झाल्याचे अनेकजण मानतात.

आदित्य नारायणने देखील विशालच्या निर्णयावर प्रतिक्रिया देताना 'एक युग संपत आहे. तुमच्याशिवाय इंडियन आयडल पूर्वीसारखे राहणार नाही' असे म्हटले आहे. 'इंडियन आयडल'चा हा सीझन संगीतप्रेमींसाठी संस्मरणीय ठरला. हा कार्यक्रम गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये सुरू झाला आणि देशभरातील हजारो गायकांनी त्यात नशीब आजमावले. अनेक महिन्यांच्या स्पर्धेनंतर आणि कठोर निर्णयानंतर अंतिम फेरीत मानसी घोष, सुभोजित चक्रवर्ती, स्नेहा शंकर, चैतन्य देवढे, प्रियांशु दत्ता आणि अनिरुद्ध सुस्वरम हे स्पर्धक होते.

सर्वांनीच उत्तम सादरीकरण केले असले तरी शेवटी मानसी घोषने शक्तिशाली आणि भावपूर्ण गायनामुळे या हंगामाची ट्रॉफी जिंकली. खऱ्या समर्पणाने आणि कठोर परिश्रमाने कोणतेही ध्येय साध्य करता येते, हेच या सगळ्यांच्या प्रवासाने सिद्ध केले.

# एसीपी प्रद्युम्नला निरोप?



'सीआयडी' टीव्हीवरील सर्वात जास्त काळ प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमांपैकी एक आहे. सस्पेन्स आणि थ्रिलने भरलेला हा शो गेल्या दोन दशकांपासून प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहे. तो गेल्या महिन्यात तब्बल सात वर्षांनी परतला पण आता एका बातमीने सर्वांनाच दुःख झाले आहे. एसीपी प्रद्युम्नची भूमिका 'सीआयडी २' मधून काढून टाकण्यात आली आहे. ही भूमिका प्रसिद्ध अभिनेते शिवाजी साटम यांनी साकारली होती. त्यांनी २० वर्षे प्रद्युम्नची भूमिका रंगवली. यातील त्यांचे संवाद खूप प्रसिद्ध, लोकप्रिय झाले. पण आता तरुण अभिनेता पार्थ समथान त्यांची जागा घेत आहे. तो या शोमध्ये एसीपी आयुष्मानची भूमिका साकारताना दिसणार आहे. पार्थ समथानने नवीन एसीपी म्हणून सीआयडीमध्ये सामील होण्याच्या वृत्ताला दुजोरा दिल्यापासून 'सीआयडी' हा हॅशटॅग सोशल मीडियावर ट्रेंड करत आहे. काही लोक पार्थच्या आगमनाचा आनंद साजरा करत आहेत तर काही एसीपी प्रद्युम्नच्या बदलीमुळे नाराज आहेत. एकूणच सोशल मीडियावर सीआयडीचे चाहते विभागले गेले आहेत. काही लोक निर्मात्यांवर राग काढत आहेत तर काहींना कदाचित त्यांना लाडका अभिनेता पुन्हा शोमध्ये येण्याची आशा आहे. काही लोक तर पार्थऐवजी अभिजीत किंवा दया यांना नवीन एसीपी बनवायला हवे होते, असेही म्हणत आहेत.

# वाद रंगला पण यश लाभले

'एल२ एम्पुरन' या अ‍ॅक्शनने भरलेल्या चित्रपटाची कथा प्रेक्षकांना खूपच आवडली आहे. मोहनलाल आणि पृथ्वीराज सुकुमारन यांच्या उत्तम अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात खास स्थान निर्माण केले आहे. त्याचा थेट परिणाम चित्रपटाच्या कलेक्शनवर दिसून येत आहे.

२१ कोटी रुपयांची ओपनिंग असणाऱ्या या चित्रपटाला रिलीजनंतर अनेक वादांना तोंड द्यावे लागले. पण 'कठोर परिश्रम करणारे कधीही हारत नाहीत' ही म्हण निर्मात्यांनी खरी करून दाखवली. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर सातत्याने उत्तम कलेक्शन करत आहे. चित्रपटाने रिलीजच्या



१२ व्या दिवशी १.५६ कोटी रुपये कमावले आहेत. त्यानंतरही प्रत्येक दिवशी चांगले कलेक्शन होत आहे. त्यामुळेच चित्रपटाचे एकूण कलेक्शन ९९.९१ कोटींच्या घरात पोहोचल्याचे कळते. याचा थेट अर्थ असा की, चित्रपटाने फक्त भारतातच १०० कोटी कमावले आहेत. मल्याळम चित्रपट उद्योगासाठी ही नक्कीच आनंदाची गोष्ट आहे. मोहनलालने त्याच्या इंस्टाग्रामवर एक पोस्ट शेअर करताना सांगितले की, 'या चित्रपटाने जगभरात २५० कोटींहून अधिक कमाई केली आहे.

'एल२ एम्पुरन' हा पृथ्वीराज सुकुमारन दिग्दर्शित २०१९ च्या ब्लॉकबस्टर चित्रपट 'लुसिफर'चा सिक्वेल आहे. या अ‍ॅक्शन थ्रिलरमध्ये राजकीय षडयंत्र, गुंड नाटक आणि जागतिक माफिया नेटवर्कची कथा प्रभावीपणे दाखवण्यात आली आहे. चित्रपटात मोहनलाल मुख्य भूमिकेत असून विवेक ओबेरॉय, मंजू वॉरियर आणि इतर दिग्गज कलाकारांची चांगली साथ मिळाल्यामुळे चित्रपटाची लोकप्रियता वाढत असून बॉक्स ऑफिसवर तो उत्तम कमाई करत आहे. आधी उल्लेख केल्याप्रमाणे या चित्रपटाबद्दल आधी बराच वाद होता. २००२ च्या गुजरात दंगलींबद्दल बरेच काही दाखवण्यात आल्याने प्रेक्षकांचा एक गट या चित्रपटावर बंदी घालण्याचीही मागणी करताना दिसला. परंतु वादानंतर सीबीएफसीने मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आणि निर्मात्यांना चित्रपटात २४ कट करण्यास सांगितले. यानंतर मोहनलाल, पृथ्वीराज आणि निर्मात्यांनेही या वादावर निवेदन जारी केली.

# सुहास्य तुझे...!



अलिकडेच 'स्त्री २' चे दिग्दर्शक अमर कौशिक यांनी एका मुलाखतीमध्ये श्रद्धा कपूरच्या हास्याचे वर्णन चेटकिणीसारखे... असे केले होते. अर्थातच या कमेंटवर आता अभिनेत्रीने प्रतिक्रिया दिली आहे. अलिकडेच एका कार्यक्रमाच्या निमित्ताने ती अमर कौशिक यांना भेटली. तेव्हा आपल्या कॉमेंटवर कौशिक यांनी श्रद्धाची सर्वांसमोर माफी मागितली आणि या प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला.

ही क्लिप व्हायरल झाली असून त्यात दोघेही पापाराझींसाठी पोझ देत मजा करताना दिसत आहेत. यावेळी अभिनेत्रीने मोठ्याने हसून अमरला चिडवल्याचे दिसत आहे. इतकेच नव्हे तर श्रद्धा कपूरने अमरला चिडवत म्हटले की, आजकाल तो खूप विनोद करतोय. श्रद्धाने असे म्हटल्यावर अमरने कान धरले आणि तिची माफी मागितली. त्यानंतर श्रद्धाने त्याला आणखी चिडवले आणि म्हणाली, 'चला याला आणखी थोडे घाबरवू या...' यानंतर दिग्दर्शकाने, 'मला भीती वाटते पण सर्वात जास्त भीती तुझ्या चाहत्यांची वाटते...' असे म्हणत खेळीमेळीच्या वातावरणात चर्चा संपवण्याचा प्रयत्न केलेला दिसला. या कार्यक्रमात श्रद्धा कॅज्युअल लूकमध्ये दिसली. तिने पांढऱ्या टी-शर्टसोबत डेनिम जीन्स घातली होती. लूक साधाच ठेवला होता. अर्थातच कॅज्युअल लूकमध्येही ती खूप सुंदर दिसत होती.

अलिकडच्याच एका मुलाखतीत अमर कौशिक यांनी श्रद्धा कपूरला 'स्त्री'मध्ये का घेतले हे सांगितले. श्रद्धाच्या कास्टिंगचे श्रेय दिनेश विजान यांना जाते, असे ते यावेळी म्हणाले. एका फ्लाइटमध्ये भेटताच श्रद्धाला कास्ट करण्यास त्यांनी होकार दिला, असे यावेळी त्यांनी स्पष्ट केले. दिनेशला श्रद्धाचे हास्य विशेष आवडले होते. दिग्दर्शकाने असेही सांगितले की, पहिल्यांदा भेटला तेव्हा त्याने प्रथम श्रद्धाला हसण्यास सांगितले होते. अर्थात लोकांना त्यांचे हे विधान अजिबात आवडले नाही. त्यानंतर श्रद्धाच्या समर्थकांनी, चाहत्यांनी चांगलेच ट्रोल केले. परिणामी अमर कौशिक यांच्यावर माफी मागण्याची वेळ आली.

